# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


दिनांक : २१.०१.२०२५

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना– व्दितीय मुदतवाढ

विषय : माघ श्रीगणेश जयंती २०२५ उत्सवानिमित्त रथशोभायात्रेकरीता ५०० टोप्यांची खरेदी करण्याबाबत दरपत्रके मागविण्याबाबत.

माघ श्रीगणेश जयंती २०२५ उत्सवानिमित्त रथशोभायात्रेकरीता ५०० टोप्यांची खरेदी करण्याबाबत सिलबंद दरपत्रके मागविण्याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्याwww.siddhivinayak.orgया संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती –

१. सिलबंद लखोटयावर ठळक अक्षरात दरपत्रकाचा विषय स्पष्टपणे नमूद करावा. तांत्रिक दरपत्रक तपशील व मूल्य दरपत्रक तपशील इच्छूक व्यक्ती/एजन्सी/कंपनी यांनी आपली वैयक्तीक माहिती, कंपनी नोंदणी प्रमाणपत्र/उद्यम प्रमाणपत्र/गुमास्ता प्रमाणपत्र , मोबाईल क्रमांक याप्रमाणे दोन वेगवेगळया लखोटयामध्ये भरुन लाखेने सिलबंद करुन दि.२४/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतिक्षालय इमारतीमधील तळ मजला आवक जावक नोंदणी शाखेत सादर करावी.

२. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे कर मिळून एकत्रित एकूण रक्कम भरावी. दरपत्रक भरताना न्यासाने दिलेल्या दरपत्रकात भरून देणे आवश्यक व गरेजेचे आहे. न्यास दरपत्रकात दर भरून न दिल्यास सदर कंपनीस अपात्र ठरविण्यात येईल.

३. दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून २०–२५ किमी अंतरावर असणे आवश्यक आहे. जेणेकरुन न्यासास त्वरीत सेवा उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

४. आपण केलेल्या कामाचा सविस्तर तपशिल व छायाचित्र देयकासोबत जोडण्यात यावी. अन्यथा देयके अदा केले जाणार नाही.

५. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही.

६. आपणास दिलेल्या वेळेनुसार काम पूर्ण न केल्यास संबंधितांवर नियमांप्रमाणे कडक कार्यवाही करण्यात येईल.

७. काम करण्यापूर्वी कोणतेही आगाऊ प्रदान केले जाणार नाही. न्यासाच्या परवानीशिवाय कोणतेही अतिरिक्त काम करण्यात आल्यास केलेल्या कामाचा जादा मोबदला आपणास देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. काम पूर्ण केल्यानंतर न्यासास बिल सादर करताना बिलासोबत पॅनकार्ड/जीएसटी क्रमांकाचा तपशील व कंपनीच्या बॅकेचा तपशील (बॅकेचे नांव, खाते क्र., आयएफएसी कोड ) जोडावा.

८. कर्मचारी भरपाई अधिनियम १९२३ या कायद्याअंतर्गत आपणावर सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

९. माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालयात दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११/१११२ वर न्यासाचे पर्यवेक्षक, देखभाल व दुरूस्ती विभाग यांच्याशी संपर्क साधावा.

१२.नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी दरपत्रकधारक यांची राहील.

१३.दरपत्रकधारकाने GST क्रमांक व PAN कार्ड दरपत्रकांत नमूद करावा व दरपत्रकासोबत जोडावा.

१४.दरपत्रकधारकाने GST क्रमांक लागू नसल्यास, कंपनी लेटरहेडवर तसे नमूद करून न्यास दरपत्रकासोबत सादर करावे.

१५.दि.२४/०१/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. दरपत्रके उघडताना दरपत्रकधारकाने सदर दिवशी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. दरपत्रकधारक दरपत्रके उघडताना उपस्थित न राहिल्यास दरपत्रक उघडल्यानंतर आपले कोणतेही म्हणणे मान्य केले जाणार नाही. दरपत्रके उघडल्यानंतर दरपत्रकामध्ये कोणतेही बदल करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

# दरपत्रकाचा तपशील

विषय : माघ श्रीगणेश जयंती २०२५ उत्सवानिमित्त रथशोभायात्रेकरीता ५०० टोप्यांची खरेदी करण्याबाबत.

नाव:-----------------------------------------------------------

पत्ता:----------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

कंपनी नोंदणी क्रमांक : .............. जीएसटी क्रमांक : ............... पॅन कार्ड क्रमांक : .....................

| अ.क्र. | तपशील | प्रति नग दर (सर्व करांसहित) |
| --- | --- | --- |
| १ | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर नांव व लोगो असलेली टोपी. | |

टिप – एकूण ५०० नग मागविण्यात येणार आहेत.

दरपत्रकधारकाची सही व शिक्का